महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

जा.क्र.संवैशिवसं/आस्था-३-अतांत्रिक/म.लो.आ-लिपिक-२०२५/ ४७०२ /२०२५ दि. १२/०८/२०२५

**ज्ञापन**

महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३ या परीक्षेतील लिपिक टंकलेखक संवर्गाच्या विज्ञापित ७००६ पदांसाठी दिनांक १७.१२.२०२३ रोजी घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल दि. ११.०७.२०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे.

महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने क्रमांकः १४४२/गट-क संयुक्त-लि.टं/२०२३/चोवीस, दिनांक १८.०७.२०२५ च्या पत्रान्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई बाहेरील उमेदवारांची लिपिक टंकलेखक गट-क या पदावर शिफारस केली आहे.

लिपिक टंकलेखक, गट-क या पदावर शिफारस केलेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्याकरीता पुढील अटी व शर्ती विहित करण्यात येत आहेत :

(१) सदर विवरणपत्रातील उमेदवारांनी खालील नमूद दिनांकास संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई येथे व्यक्तिशः उपस्थित राहणे/मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत उमेदवार व्यक्तिशः उपस्थित न झाल्यास / मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी न झाल्यास त्यांचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता, या विभागाच्या निवडसूचीतून कमी करण्यांत येईल.

(२) लोकसेवा आयोगाकडे केलेल्या अर्जातील दाव्यांची तपासणी / पडताळणी आयोगाने केलेली नसल्याने, उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्र पडताळणीकरीता संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई येथे खालील नमूद केल्यानूसार खालील पत्यावर विहित दिनांकास व वेळेस उपस्थित रहावे.

| अ.क्र. | गुणवत्ता क्रमांक | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | १ ते १२० | १८/०८/२०२५ | शासकीत दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई<br>तिसरा मजला सभागृह,<br>सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| २ | १२१ ते २४० | १९/०८/२०२५ | |
| ३ | २४१ ते ३६२ | २०/०८/२०२५ | |

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३ साठी देण्यात आलेल्या जाहिरात क्रमांक: १११/२०२३, दिनांक १३.१०.२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार वयोमर्यादेची दिनांक ०१.०५.२०२३ रोजीच्या अर्हतेनुसार तसेच शैक्षणिक आणि अन्य अटींची दिनांक ३१.१०.२०२३ किंवा तत्पुर्वीच्या अर्हतेनुसार खाली नमूद केलेली मूळ प्रमाणपत्रे उमेदवारांनी सोबत घेऊन यावीत. उपस्थित रहाताना सदर प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत उमेदवाराजवळ असणे अत्यावश्यक आहे:-

(i) वयोमर्यादा (दिनांक ०१.०५.२०२३ रोजी तसेच प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार)

(ii) अधिवास : मुख्य परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे

(ii) शैक्षणिक अर्हता सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी म्हणजेच दिनांक ३१.१०.२०२३ किंवा तत्पूर्वी धारण करणे अत्यावश्यक आहे.

(iv) अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांनी अंतर्वासिता (INTERNSHIP) मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या दिनांकापर्यंत (दिनांक ३१.१०.२०२३ किंवा तत्पूर्वी) पूर्ण केली असेल तरच त्यांना पदवीधर समजण्यात येईल.

(v) महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात दि. २०.०१.२०२३ व मुख्य परीक्षेची जाहिरात दि. १३.१०.२०२३ रोजी विज्ञापित केलेली आहे. वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज. (ड), वि.मा.प्र., आ.दु.घ. व इ.मा.व. प्रवर्गाचा दावा केला असल्यास अशा उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार तसेच शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मोवक, दि.०९.०३.२०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सन २०२२-२३ चे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(vi) प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या जाहिरातीमधील परिच्छेद ६.३.१ (चार) नुसार मराठी ज्ञान आवश्यक आहे. सदर बाब तपासण्याकरीता संबंधित उमेदवाराने दहावीचे गुणपत्रक किवा महाविद्यालयाच्या प्राचार्य/विभाग प्रमुखांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(vi) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छीणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(viii) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१.१०.२०१३ नुसार अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखक अर्हता-बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे. सदर अर्हता मुख्य परिक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पुर्वी (दिनांक ३१.१०.२०२३ किंवा तत्पूर्वी) धारण करत असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(४) उमेदवारांच्या पात्रता विषयक म्हणजेच शिक्षण, वय, खेळाडू, दिव्यांग, जाती विषयक प्रमाणपत्र, इत्यादीबाबतच्या मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी आयोगाने केली नसल्यामुळे या सर्व बाबतीत पडताळणी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत उमेदवारांचे शिक्षण, वय, खेळाडू असल्यास त्यांबाबतची प्रमाणपत्रे, शारीरिक अपंग असल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे, इत्यादीबाबतची मूळ प्रमाणपत्रेही अधिसूचनेत नमूद केलेल्या अर्हतेनुसार सादर करणे आवश्यक राहील. आयोगाला सादर केलेल्या अर्जातील दाव्याच्या तपासणीसाठी आवश्यक व

योग्य ती प्रमाणपत्रे उमेदवार सादर करु शकला नाही तर, उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणार नाही व उमेदवाराची शिफारस आपोआप रद्द समजण्यात येईल व तसे आयोगाला कळविण्यात येईल.

(५) खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१.७.२०१६, रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच, त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८.०८.२०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२, दिनांक १७.३.२०१७, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२, दिनांक २७.३.२०१७, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १०.१०.२०१७, व शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५.११.२०१७, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३०.०६.२०२२ रोजीच्या तरतूदीनुसार आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लिपिक टंकलेखक गट-क पदांसाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या दिनांक १४.०२.२०२३ रोजी किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील व तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. संबंधित उमेदवाराने विभागीय क्रीडा उपसंचालकांच्या दिनांक १४.०२.२०२३ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर करणे आवश्यक राहील. संबंधित विभागीय उपसंचालकांच्या वर उल्लेखित विहित दिनांकाच्या पडताळणी अहवालाच्या तपासणीनंतरच गुणवत्ताधारक खेळाडू पदावर शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

(६) दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासून घेण्यात आल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. तसेच सा.प्र.वि,शा.नि.क्र.अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ०६.०५.२००४ मधील बाब क्र. (६) नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीस पात्र ठरतील. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक अप्रकि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ०६.१०.२०१२ मधील आदेशानुसार SADM या नवीन संगणक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगतवाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्रकि २०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र शासनास नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे,२०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल. तसेच याबाबत खाली नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रकांमधील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल :-

(अ) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ०६.०५.२००४

(ब) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : न्यायाप्र-२००९/प्र.क्र.९/सुधार-३, दिनांक ०३.०८.२०१०

(क) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : अपंग २००९/प्र.क्र.१३३/सुधार-३, दिनांक १४.०१.२०११

(ड) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : अप्रकि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ०६.१०.२०१२

(७) अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्र. अनाथ-२०२२/प्र.क.१२२/का.०३, दि.०६.०४.२०२३, दि.१०.०५.२०२३ अनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येंईल.

(८) ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आली. असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५.दिनांक १६.५.२००७ मधील सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(९) मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांच्याबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक १८.०५.२०१३ मध्ये नमूद सूचनांनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी कार्यवाही करणे अपेक्षित असून, मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार जात वैधता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल. सदरहू उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेतलेले जाती वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्तीसाठी हजर होताना ते सादर करावे. नसल्यास त्याने जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे नियुक्ती प्राधिकाऱ्यास तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

(१०) लिपिक टंकलेखक पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या उमेदवाराकडे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ व शासन पूरकपत्र क्र. मातंसं २०१२/प्र.क्र.२७०/३९, दिनांक ०८.०१.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता आवश्यक आहे. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सदर प्रमाणपत्र/अर्हता उमेदवारांकडे नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून दोन वर्षाच्या आत उमेदवाराने उपरोक्त शासन निर्णयातील नमूद संस्थेचे संगणक ज्ञानाच्या अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या विहित कालावधीत उमेदवाराने सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही- २०१७/प्र.क्र.४६२/कार्या. १२, दिनांक २८.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(११) माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३.०६.२०१९ व. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का- २८ दिनांक ३०.०५.२०२३ नुसार शासकीय वाणिज्य संस्थेचे विहित वेगाच्या टंकलेखनाचे प्रमाणपत्र शासन सेवेतील नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी शासनाला सादर करण्याच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येईल. तथापि सदर मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास, उपरोक्त नमुद शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांबाबत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः आरटीए-१०९०/प्र.क्र.२२२/९१/२८, दिनांक ३०.१२.१९९१ मधील तरतूदींची पूर्तता होत असेल तरच त्यांना नियुक्ती देण्यात येईल. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकःआरटीए-१०८२-३५०२-सीआर-१००-१६-अ, दिनांक २.९.१९८३ नुसार माजी सैनिक वर्गवारीचा दावा केलेल्या उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या माजी सैनिक वर्गवारीच्या दाव्याच्या तपासणीच्या अधीन राहून करण्यात येईल.

(१२) महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ लिपिक टंकलेखक परीक्षेचे प्रवेशपत्र/गुणपत्रिका सोबत आणणे आवश्यक राहील. तसेच अधिकृत मूळ ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील. सादर केलेले ओळखपत्रातील फोटो व स्वाक्षरी व अर्जातील उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी याची तपासणी केल्यानंतरच संबंधित उमेदवाराची लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती करण्यात येईल.

(१३) साक्षांकन नमुना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर साक्षांकन नमुना पूर्णपणे भरुन उमेदवाराने त्याची नियुक्ती करण्यात येणाऱ्या ठिकाणी हजर होताना सादर करणे आवश्यक राहील. हजर झालेल्या उमेदवारांकडून साक्षांकन नमुने प्राप्त करुन घेतल्यानंतर उमेदवारांच्या पूर्व-चारित्र्याची पडताळणी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक चापअ १००८/प्र.क्र.२१४/०८/१६-अ, दिनांक ०९.०१.२००९ आणि शा.नि.क्र.चारित्र्य २११७/ प्र.क्र.४८३/ २०१७.१६ अ दि. २८.०८.२०१७ मधील तरतुदी विचारात घेऊन पोलीस विभागाकडून करुन घेण्यात येईल व अहवाल प्रतिकूल असल्यास, प्रस्तुत शासन निर्णयातील सूचनांनुसार संबंधित उमेदवारांच्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या चारित्र्य पडताळणी संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक चापअ१०१२/प्र.क्र.६३/१६-अ, दिनांक २६.०८.२०१४ मधील सूचनादेखील विचारात घेण्यात येतील

(१४) प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विविध मुळ अर्ज याचिका प्रकरणी होणाऱ्या अंतिम निकालाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे, ही बाब विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ मधून उमेदवारांची शिफारस केली आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(१५) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई येथे व्यक्तिशः उपस्थित राहणे / मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी यासाठी उपस्थित रहाण्याकरीता लागणारा प्रवास खर्च उमेदवाराने स्वतःच सोसावयाचा आहे.

(१६) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई येथे व्यक्तिशः उपस्थित राहिल्यानंतर / मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आल्यानंतर, जे उमेदवार प्रमाणपत्र पडताळणी अंती पात्र ठरतील त्यांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

(१७) उक्त नमूद अटींची पूर्तता होत नसल्यास उमेदवारांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

(१८) उमेदवारांनी शक्य असल्यास त्यांची प्रमाणपत्रे DIGILOCKER मध्ये देखील अपलोड करुन आणावीत.

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

प्रति,
लिपिक टंकलेखक या पदावर शिफारस करण्यात आलेल्या यादीतील सर्व उमेदवार (ई मेल द्वारे)

प्रत :-

१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय, आवार, मुंबई-०१

२) मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.